# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि नगर, अकोला.

ग्राम : युनिव्हर्सीटी
दुरध्वनी : ००९१-०७२४-२२५८३८६
फॅक्स् : ००९१-०७२४-२२५८३७२


## परिपत्रक

जा.क्र. साप्रवि/जीएससी/ध्वजदिननिधी-२०/2326/२०२१. दिनांक :- 08/०२/२०२१.

मा. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे **पत्र क्र. १३०२/ध्व. नि-१७/जिसैकका, दिनांकः- ११/१२/२०२०** नुसार आवाहन केले आहे की, **२०२०** चा ध्वजदिन निधी संकलना करिता महाराष्ट्र शासनाने अकोला जिल्हयास यावर्षी **६८,३०,०००/-** चे उद्दीष्ट दिले आहे.

करिता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांचे कडुन सोबत जोडलेल्या पत्रामध्ये दर्शविलेल्याप्रमाणे या कल्याणकारी व राष्ट्रीय कार्यास हातभार लावण्याकरिता सशस्त्र सेना ध्वजदिन २०१८ निधी संकलनाकरिता सक्रीय योगदान देऊन संकलित झालेला निधी कृपया बँक ड्राफ्ट / धनादेश स्वरूपात '**जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालय, अकोला**' यांचे नावाने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अकोला ४४४००१ (दुरध्वनी क्र. ०७२४२४३३३७७) येथे दिनांक **३१ मे २०२१** पुर्वी जमा करावे. तसेच केलेल्या कार्यवाहीची प्रत माहितीकरिता या कार्यालयास पाठवावी.

सोबतः- वरिलप्रमाणे.

कुलसचिव
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.

प्रत :

१) संचालक (सर्व) डॉ. पं.दे. कृ. वि., अकोला.
२) अधिष्ठाता (सर्व) डॉ. पं.दे. कृ. वि., अकोला.
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व)............................ डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
४) विभाग प्रमुख (सर्व) ............................ डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
५) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व)............................ डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
६) नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
७) कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ------------------------------------
८) मा. कुलगुरू महोदय /कुलसचिव महोदय यांचे स्वीय सहायक यांना माहीतीकरिता.
९) वेतन व लेखाधिकारी, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
१०) ARIS cell for website circulation..........डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.

c/125

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जितेंद्र पापळकर** भा.प्र.से.

जिल्हाधिकारी
व
जिल्हा दंडाधिकारी

अ.शा.पत्र क्र. १३०२/ध्व.नि.२०/जिसैकंका
जिल्हाधिकारी कार्यालय,
अकोला – ४४४००१
E-mail : zswo_akola@maharashtra.gov.in

दिनांक :- ११/१२/२०२०

सशस्त्र सेना ध्वजदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना शुभेच्छा देतो. सद्या सीमेवर नित्य घडणाऱ्या घटनामुळे सर्व भारतवासी व्यथीत व क्रोधीत असले तरी आपली सैन्यबले अपार शौर्य गाजवित आहेत. याचा आपण सर्वांना अभिमान आहे. अनेक सैनिकांनी आपले प्राणांचेही बलिदान दिले आहे. त्यांच्या हौतात्म्यांचे मोल जाणून आपल्या विभागातील सर्वच अधिकारी व कर्मचारी तसेच विविध संघटना यांनी आपले उत्स्फुर्त योगदान देवून मागील वर्षी रु.६८,३०,०००/- (अडुसष्ट लाख तीस हजार मात्र) चे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे राष्ट्रीय कार्य उदार मनाने पुर्ण केले होते. अकोलेकर अशा राष्ट्रीय कार्यक्रमास सदैव अग्रेसर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या करिता सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

या वर्षी सुद्धा आपण मागील वर्षीप्रमाणे हा ध्वजदिन निधी अतिशय अल्पावधितच म्हणजेच ३१ मे २०२१ पूर्वीच संकलित करण्याचा निश्चय करूया. या करीता मला, जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला या नात्याने आपले तसेच आपल्या अधिनस्त कर्मचारी यांचे योगदान अतिशय महत्वाचे वाटते. या अनुषंगाने ध्वजदिन निधी संकलन करण्या करता काढलेल्या आवाहन पत्रकाची प्रत सोबत संलग्न करण्यात येत आहे.

आपल्या विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गा कडून आवाहन पत्रकात नमुद केल्याप्रमाणे सढळ हाताने ध्वजदिन निधी संकलित व्हावा अशी माझी अपेक्षा आहे. आपणास योग्य वाटल्यास माझ्या या अर्ध शासकिय पत्राची छायांकित प्रत आपण आपल्या अधिनस्त कार्यालयातील सर्वांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधी बद्दल स्मरण करून देण्या करीता वितरीत करावी जेणेकरून या राष्ट्रीय कार्याच्या महत्वाची जाण तळागाळापर्यंत पोहोचण्यास प्रोत्साहन मिळेल. या राष्ट्रीय कार्यास आपले तसेच आपल्या विभागाच्या सर्व अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्यांचे दरवर्षीप्रमाणे भरीव योगदान लाभेल अशी मला खात्री आहे.

Dy Registrar (GAD)
Issue Circular
14/01

REGISTRAR OF
Dr. P.D.K.V., Akola
In. No. 2722
14 JAN 2021

स्नेहपूर्वक

आपला स्नेहांकित

Estt./Comm./Exam./GAD.

O/o. REGISTRAR
No.............
Dt..............
Dr. P.D.K.V., Akola

सहपत्र : आवाहन पत्रक

प्रती,
मा. कुलसचीव
डॉ. पं. दे. कृ. विद्यापीठ अकोला

(जितेंद्र एस. पापळकर)

दुरध्वनी :- कार्यालय (०७२४) २४२४४४२ निवास : २४२४४४१ फॅक्स : २४३५००७ मोबा.: ९४२०४८७०५५
E-mail : Collector. Akola@maharashtra.gov.in • jspapalkar@gmail.com

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला
# सशस्त्र सेना ध्वजदिन २०२० निधी संकलन शुभारंभ
# * आवाहन *

१.	माजी सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणकारी कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेण्याकरीता ध्वजदिन म्हणून ०७ डिसेंबर हा दिवस संपूर्ण देशात पाळला जातो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या स्वातंत्र्याची अमर ज्योत सतत तेवत ठेऊन मातृभूमीचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे महान कार्य देशाच्या शूर सैनिकांवर आहे याची जाणीव आपणा सर्वांना आहे.

२.	सध्या देशाच्या सीमेवरील वातावरण अत्यंत अशांत आहे. जवळजवळ युद्धासारखीच परिस्थिती आहे. शहीद सैनिकांची दररोज वाढत जाणारी यादी आपण भारतवासीयांना अस्वस्थ करीत असते. सारे जनमानस क्रोधीत असतांना आपली सैन्यदले मात्र संयमाने परंतु प्रखर व प्रभावी कार्यवाही करीत आहे. ही बाब आपणासाठी अभिमानाची आहे.

३.	युद्ध क्षेत्रात किंवा अतिरेकी कार्यवायांमध्ये मातृभुमिच्या रक्षणासाठी आत्मबलिदान करून वीरगती लाभलेल्या लष्करातील जवानांच्या बलिदानाची परतफेड अंशतः का होईना आपण त्यांच्या कुटुंबियांचे/अवलंबितांचे पुनर्वसन करून करू शकतो. याकरिता गरज पडते ती म्हणजे ध्वजदिन निधीची. युद्धक्षेत्रात किंवा अतिरेकी कारवायांमध्ये शहीद झालेले, अपंगत्व आलेले जवान तसेच माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय यांचे साठी महाराष्ट्र शासन निरनिराळ्या कल्याणकारी योजना राबवित आहे. या योजनाकरिता लागणारा खर्च ध्वजदिन निधी संकलन करून उभारला जातो.

४.	या वर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन २०२० निधी संकलित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्ह्यास रू. रु. ६८,३०,०००/- चे उद्दिष्ट दिले आहे. या राष्ट्रीय कार्यास सर्वच विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, संघटना तसेच शाळा/महाविद्यालये, व्यापारी वर्ग, कारखानदार तसेच सर्वसामान्य नागरिक सक्रिय हातभार लावीत असतात.

५.	अकोला जिल्ह्यातील सर्वच विभाग, कार्यालये, महाविद्यालये, शाळा, इतर शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच कारखानदार, सहकारी संस्था इत्यादी दरवर्षी पेक्षाही जास्त सहकार्य करून अकोला जिल्ह्याचे ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास आपले सर्व स्तरांवर सक्रिय योगदान करतील याचा मला पूर्ण विश्वास आहे.

६.	जिल्हाधिकारी व अध्यक्ष, ध्वजदिन निधी संकलन समिती, अकोला या नात्याने मी आवाहन करीत आहे की प्रत्येकाने हा निधी उभारणीसाठी सर्वोतोपरी सहाय्य करावे व कल्याणकारी राष्ट्रीय कार्यास हातभार लावावा.

C/131

वाचा:- मा. जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण मंडळ, अकोला यांचे पत्र क्रं १३०२/ध्वनि-२०२०/जिसैकका-३

दिनांक : ११ डिसेंबर २०२०

# सुचना

सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सुचित करण्यात येते की मा. जिल्हाधिकारी, अकोला यांनी सशस्त्र सेना ध्वजदिन २०२० निधी संकलनाकरीता सढळ हस्ते मदत करण्याचे आवाहन केलेले आहे. त्यानुसार प्रसिध्द केलेल्या आवाहन पत्रकाप्रमाणे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे सशस्त्र सेना ध्वजदिन २०२० चे योगदान जानेवारी ते मार्च २०२१ च्या वेतनातून कपात करुन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अकोला (दूरध्वनी क्र. ०७२४/ २४३३३७७) येथे संकलीत निधी जमा करुन पावती घ्यावी व माहे मार्च/एप्रिल २०२१ च्या देयकासोबत जोडावी याची कृपया नोंद घ्यावी. प्रस्तूत राष्ट्रीय कार्यास सहकार्य करावे, ही विनंती.

जिल्हा कोषागार अधिकारी
अकोला

11/12/20

कोषागार कार्यालय, अकोला

अकोला

# सशस्त्र सेना ध्वजदिन निधीस सढळ हाताने मदत करा

७. सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची वर्गवारी लक्षात घेऊन त्यांचे कडून खालील प्रमाणे योगदान मिळावे असे आवाहन मी या पत्रकाव्दारे करीत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| अ. | उच्च पदस्थ वरिष्ठतम अधिकारी कुलगुरु, जिल्हाधिकारी पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्त (म.न.पा.) प्राचार्य, विद्यापिठातील प्राध्यापक, प्रादेशिक विभाग प्रमुख | रु. २,०००/- प्रत्येकी |
| ब. | अधिकारी वर्ग-१ (कार्यालय प्रमुख, अधिव्याख्याते) | रु. १,५००/- प्रत्येकी |
| क. | अधिकारी वर्ग-२ व तत्सम दर्जाचे अधिकारी मुख्याध्यापक (माध्यमिक शाळा) इ. | रु. ७००/- प्रत्येकी |
| ड. | वर्ग ३ चे कर्मचारी, मुख्याध्यापक (प्राथमिक शाळा) माध्यमिक / प्राथमिक शाळांचे शिक्षक प्रत्येकी | रु. ५००/- प्रत्येकी |
| इ. | वर्ग ४ चे कर्मचारी | रु. २००/- प्रत्येकी |

८. जिल्ह्यातील सर्व सामान्य नागरीकांनी देशप्रेमाची भावना जपून प्रत्येकाने या कामी सढळ हाताने योगदगान करावे.

९. संकलित झालेला निधी कृपया **बँक ड्राफ्ट / धनादेश** स्वरुपात '**जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला**' यांचे नावाने **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला-४४४००१** (दुरध्वनी क्र. ०७२४-२४३३३७७) येथे ३१ मे २०२१ पूर्वी जमा कराल असा मला पूर्ण विश्वास आहे.

धन्यवाद!

स्थळ : अकोला
दिनांक ११/१२/२०२०

आपला स्नेहांकित

**(जितेंद्र एस. पापळकर)**
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला

प्रती, ______________________

______________________